**<u>ठळक बातम्या</u>**

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीचा फेरविचार करावा असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन

- देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत यंदा १२ टक्क्यांची वाढ झाल्याची वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची माहिती

- सन २०२३ चा ज्ञानपीठ पुरस्कार संस्कृत पंडित जगद्गुरू रामभद्राचार्य आणि उर्दू कवी गुलझार यांना प्रदान

**आणि**

- राज्यात संपूर्ण आठवडा पावसाचा

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीचा फेरविचार करावा असं आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या भुज इथल्या वायुसेना तळावर जवानांना संबोधित करत होते. नाणेनिधीने दिलेल्या मदतीचा मोठा भाग दहशतवादी कारवायांवर खर्च होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूर मधल्या वायुसेनेच्या कामगिरीची त्यांनी प्रशंसा केली तसंच या प्रतिहल्ल्याचं देशभरात आणि जागतिक स्तरावर कौतुक होत आहे, असं ते म्हणाले.

पाकिस्तानशी केलेली शस्त्रसंधी म्हणजे लष्करी कारवाईचा पूर्णविराम नसून केवळ अल्पविराम आहे, वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर जसं पोलीस लक्ष ठेवून असतात त्याचप्रमाणे आम्ही पाकिस्तानवर लक्ष ठेवून आहोत आणि पाकिस्तानने पुन्हा काही आगळीक केल्यास त्याला आपलं सैन्यदल धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही असा इशारा संरक्षण मंत्र्यांनी यावेळी दिला.

<><><><>

देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत मागील वर्षीच्या तुलनेत १२ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांची वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं सांगितलं आहे. या वर्षी एप्रिल महिन्यात ७३ अब्ज ८० कोटी डॉलर्सची निर्यात करण्यात आली. मागील वर्षी याच काळात ६५ अब्ज ४८ कोटी डॉलर्स इतकी निर्यात झाली होती. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या वस्तू निर्यातीत या महिन्यात ९ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांनी वाढ होऊन ती ३८ अब्ज ४९ कोटी डॉलर्स झाली आहे. एप्रिल मधे देशाची एकूण वस्तू आणि सेवांची आयात ८२ अब्ज ४५ कोटी असून मागील वर्षीच्या तुलनेत ती १५ पूर्णांक ७२ शतांश टक्क्यांनी वाढली आहे.

<><><><>

संस्कृत पंडित जगद्गुरू रामभद्राचार्य आणि उर्दू कवी गुलझार यांना २०२३ सालचा ज्ञानपीठ पुरस्कार आज प्रदान करण्यात आला आहे. नवी दिल्लीत झालेल्या ५८ व्या ज्ञानपीठ पुरस्कार वितरण समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्काराचं वितरण झालं. यावेळी राष्ट्रपतींनी पुरस्काराच्या दोन्ही मानकऱ्यांचं अभिनंदन केलं. आपल्या साहित्यसेवेचा योग्य सन्मान झाल्याचं मत यावेळी जगद्गुरू रामभद्राचार्य यांनी व्यक्त केलं.

<><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भाजपातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे.

**नागपूरमधे** कामठी इथं आज महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेच्या सुरुवातीला बावनकुळे यांनी मुख्य चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली. देशातली १४०

कोटी आणि महाराष्ट्रातली १४ कोटी जनता ही भारतीय सैन्याच्या पाठीशी आहे, असं बावनकुळे यावेळी म्हणाले.

**होल्ड ---बाईट बावनकुळे**

**सोलापूर** शहरात देखील आज तिरंगा रॅली काढण्यात आली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते अशोक चौकातल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या रॅलीचा प्रारंभ करण्यात आला. **लातूर** जिल्ह्यातल्या उदगीर इथं, तसंच **जालना** जिल्ह्यातल्या अंबड आणि बदनापूर शहरातही भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**जळगाव** शहरातही तिरंगा यात्रा काढण्यात आली, यावेळी संगीता अट्रावलकर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली….

**होल्ड बाईट - अट्रावलकर (१४ सेकंद)**

बुलढाण्यातले माजी सैनिक सुभेदार **दिवाकर फंदाट** यांनी ऑपरेशन सिंदूर बाबत आपली प्रतिक्रिया दिली..

**होल्ड बाईट - सुभेदार दिवाकर फंदाट( २७ सेकंद)**

**<><><><><>**

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत घेतलेल्या स्पर्धेत महामंडळांमधे झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणानं १०० पैकी ८२ पूर्णांक १६ गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला आहे, महावितरणनं दुसरा, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं तिसरा, महाराष्ट्र ऊर्जा अभिकरणानं चौथा, आणि महाराष्ट्र औद्यौगिक विकास महामंडळ- एमआयडीसीनं पाचवा क्रमांक मिळवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज हा निकाल जाहीर केला.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस

चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत शासनाच्या सर्व ९५ महामंडळांनी सहभाग घेतला.

**<><><><><>**

पाकिस्तानने दहशतवादी गटांशी थेट संबंध ठेवून त्यांना आर्थिक सहकार्य केल्याचं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी एका ब्रिटिश वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कबूल केलं आहे. पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही कबुली देण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं लष्कर-ए-तैयबासारख्या दहशतवादी गटांशी पाकिस्तानच्या संबंधांची तपासणी केली आहे. जागतिक पातळीवर पाकिस्तानचं दहशतवादाला खतपाणी घालण्याचं धोरण उघडकीला आणण्यासाठी भारतानं सतत प्रयत्न केले आहेत. हाफिज सईद आणि झाकी-उर रहमान लखवीसह अनेक दहशतवादी पाकिस्तानात आश्रयाला असून या व्यक्ती तसंच लष्कर-ए-तैयबा आणि जमात-उद-दावासारख्या संघटना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध यादीत समाविष्ट झाल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायानं या मुद्द्याला मान्यता दिली असल्याचं अधोरेखित झालं आहे.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं इंग्लंडच्या दौऱ्यासाठी महिला संघाची घोषणा केली आहे. २८ जून ते २२ जुलै या दरम्यान हा दौरा आहे. या दौऱ्यात दोन्ही संघादरम्यान पाच टी-ट्वेंटी तर तीन एकदिवसीय क्रिकेट सामने खेळले जाणार आहेत. या दोन्ही प्रकारच्या सामन्यासाठी भारतीय संघाचं कर्णधारपद हरमनप्रीत कौर हिच्याकडे तर उपकर्णधारपद स्मृती मंधाना हिच्याकडे असेल.

**<><><><><>**

रोमानियाची राजधानी बुखारेस्ट इथं सुरू असलेल्या सुपरबेट क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीपूर्वी भारतीय ग्रॅन्डमास्टर आर. प्रज्ञानानंद यानं आपली खेळी अनिर्णित राखून आघाडी घेतली आहे. त्याने आठव्या फेरीत अमेरिकन ग्रॅन्डमास्टर वेसले याला पराभूत केलं होतं. विश्व विजेत्या डी. गुकेश यानं अमेरिकेच्या लेवोनो आयोनियन याला पराभूत केलं.

या स्पर्धेत ५ गुण मिळवून प्रज्ञानानंद सर्वोच्च स्थानी तर साडे तीन अंक मिळवून गुकेश संयुक्तरित्या सातव्या स्थानावर आहेत.

**<><><><>**

भारताच्या परकीय चलन साठ्यात गेल्या आठवडयाच्या अखेरपर्यंत ४५५ कोटी डॉलर्सची भर पडल्यानं तो ६९ हजार ६० कोटी डॉलर्सवर पोहोचला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनं जारी केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या आठवड्यात परकीय चलन मालमत्ता १९ कोटी ६० लाख डॉलर्सनं वाढून ५८ हजार १३० कोटी डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. सोन्याच्या साठ्यात ४५० कोटी डॉलर्सची वाढ होऊन ती एकूण ८ हजार ६३३ कोटी डॉलर्सवर पोहचली आहे.

**<><><><>**

टाटा टेक्नॉलॉजीनं नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी प्रत्येकी एका 'सी ट्रिपल आयटी' प्रशिक्षण केंद्राला मंजुरी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाठवलेल्या पत्राला प्रतिसाद देत कंपनीनं ही मंजुरी दिली. मराठवाड्यात या पूर्वी बीड जिल्ह्यात एक 'सी ट्रिपल आय टी' केंद्र सुरु करण्यात आलं आहे.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात संपूर्ण महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ, तर तुरळक ठिकाणी किंचित घट झाली. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमानात घट झाली.

राज्याच्या चारही विभागांमधे पुढचा आठवडाभर तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**